REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# साहित्य क्षेत्रातील बदल

प्रा. डॉ. नामदेव विठ्ठल गवळी
मराठी विभाग, आनंदीबाई रावराणे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वैभववाडी,
जिल्हा सिंधुदूर्ग, महाराष्ट्र.

दिसा माजी काही तरी ते लिहावे।
प्रसंगी अखंडित वाचीत जावे ।।

वाचनाचे महत्त्व शब्दात सांगणे फारच कठीण आहे. समर्थ रामदासांनी मात्र वर उद्धृत केलेल्या श्लोकात ते नेमक्या शब्दात अधोरेखित केले आहे. आजकाल करमणुकींच्या साधनांचा अतिरेक झाला आहे. त्याचबरोबर जागतिक आंतरजालासारखी माध्यमे, माहिती तंत्रज्ञानातील क्रांती आणि संपर्क साधनांची सुलभता यामुळे माहिती किंवा ज्ञान मिळविणे तुलनेने सोपे झाले आहे. साहित्य क्षेत्रातील बदलांकडे याच दृष्टीकोणातून पाहणे विद्यमान वाचनसंस्कृतीच्या संवर्धनासाठी ही बाब आज अतिशय निकडीची झाली आहे. आजकाल बाजारात पुस्तकांची इतकी गर्दी झाली आहे की, आपल्याला हवे त्या विषयातील नेमके कोणते पुस्तक घ्यावे, त्या क्षेत्रात अधिकार असणारे लेखक कोण आहेत? प्रकाशक कोण आहेत? ती पुस्तके कुठे व कशी मिळू शकतील? असे प्रश्न पडतात शेतीपासून शिक्षणापर्यंत आणि भाषा व्यवहारापासून कथा कादंबऱ्या पर्यंत वेगवेगळ्या क्षेत्रात लोक वाचत असतात. गुरे जशी चरता चरता अधिक सकस चारा असणाऱ्या कुरणांकडे आपोआप जातात त्याचप्रमाणे वाचकही एकदा वाचायला लागला की आपोआप चांगल्या पुस्तकांकडे जाऊन पोहोचतो. असे भालचंद्र नेमाडे यांनी एके ठिकाणी म्हटले आहे. ज्ञानाधिष्ठित समाजरचना ही काळाची गरज ठरली आहे. यामध्ये साहित्याचे योगदान महत्त्वाचे ठरते. आजच्या जागतिकीकरणात, साहित्य क्षेत्रात आणि वाचन क्षेत्रात होत असलेल्या बदलांची नोंद सांस्कृतिक पर्यावरणाच्या बाबतीत महत्त्वाची ठरते.

वाचकांनी काय वाचावे? या संबंधात तसे निकष आढळत नसले तरी "डॉक्टरांनी मेडिकल जनरल व वैद्यकीय शास्त्रांची पुस्तके वाचावी असे अपेक्षित असते. वकिलांनी कायदयाची, घटनादुरुस्तीची, निकालासंबंधी नियतकालिके व ग्रंथ वाचावेत. मॅनेजमेंटची मंडळी मॅनेजमेंट विषयक स्तंभ, जर्नल्स, वैज्ञानिक मंडळी सायंटिफिक जर्नल्स, अर्थकारणातील मंडळी त्या विषयावरची दैनिके, 'साप्ताहिके वाचत असतात."[1] बोलणे आणि वाचणे हे सर्व सुमारे तीन हजारांच्या आसपास जगभर भाषांमध्ये अखंड चालू आहे. उदा. मराठीत बा. सी. मर्ढेकर यांच्या 'पिंपात मेले ओल्या उंदीर' या कवितेतील प्रत्येक शब्दावर (त्यातील प्रतिमा प्रतिकांवर) 70 वर्षात इतके मंडन-खंडन, चिंतन, लेखन, वाद-वितंडवाद झाले आहेत की, ते पाहून शब्दांचे अचाट सामर्थ्य लक्षात येते. तसेच एकच शब्द किती प्रकारचा विसंवाद घडवून आणू शकतो हेही ध्यानात येते.

एकविसावे शतक हे विज्ञान-तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जात आहे. या शतकातील पहिले शतक संपले - ज्याच्यावर तंत्रज्ञानाचा पगडा मोठा होता आणि आजही आहे. इंटरनेटच्या माध्यमातून

**कोणतीही माहिती क्षणार्धात उपलब्ध होत असताना पुस्तके वाचली जातात का? लोकांना पुस्तके विकत घेऊन वाचायला वेळ आहे का? ग्रंथालयात नवीन पुस्तके उपलब्ध करून दिली जातात का? असे अनेक प्रश्न मनात येतात. एकविसाव्या शतकातील नवीन जीवनशैली स्वीकारूनही पुस्तके वाचण्याकडे, विकत घेऊन वाचण्याकडे लोकांचा कल आहे. दरवर्षी भरणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात कोट्यावधी रुपयांची पुस्तकांची खरेदी होते. विविध शहरांमध्ये पुस्तक प्रदर्शने भरवली जातात व त्यांना उदंड प्रतिसाद मिळतो. विविध प्रकाशन संस्थांनी काढलेल्या पुस्तक भिशीला ग्राहक मिळत आहेत. अनेक पुस्तकांच्या आवृत्त्यांवर आवृत्त्या निघत आहेत. याचा अर्थ असा की, विज्ञान-तंत्रज्ञानाने प्रगती करूनही ग्रंथ वाचनावर मर्यादा आली नाही; ही आनंदाची आणि उत्साहपूर्ण बाबा आहे. प्रथम श्रमण परंपरा कथा कीर्तनातून, हस्तलिखितांच्या प्रतितून प्रसृत होणार साहित्य आज लेखन-मुद्रण-वाचन व्यवहाराने अधिक समृद्ध झाले आहे**

## पुस्तक प्रकाशन व्यवसाय थोडेसे. . . . .

**"बंगालमधील श्रीरामपूर येथे १८०५ मध्ये मुद्रित करण्यात आलेल्या 'मराठी व्याकरण' या पहिल्या पुस्तकाने मराठी पुस्तकाच्या प्रकाशनाची मुहूर्तमेढ रोवली."[२] १८६७ मध्ये कार्यवाहीत आलेल्या 'मुद्रणालय व पुस्तक नोंदणी अधिनियम' या कायदयानुसार ग्रंथनिर्मिती व्यवहारास आकार येऊ लागला. आज भारतातील सर्व भाषांमधील पुस्तकांच्या निर्मितीला मोठी व्याप्ती असलेल्या व्यवसायाचे स्वरूप आलेले आहे. कॉपीराईट कायदयान्वये स्वतंत्र कलाकृती, नाटक, संगीत आणि कलात्मक निर्मितीचा निर्मात्याचा हक्क संपूर्ण भारतात अबाधित राहतो.** I.S.B.N. **ही 'इंटरनॅशनल स्टॅण्डर्ड बुक नंबर' या शब्दाची अद्याक्षरे आहेत. एखाद्या लेखकाचे एकच पुस्तक असेल तर त्यास एकच** I.S.B.N. **क्रमांक मिळतो. मात्र एखादे पुस्तक, ई-बुक, पेपर बॅक आणि हार्ड कव्हर आवृत्ती अशा वेगवेगळ्या प्रकारात असेल तर त्या-त्या प्रकारासाठी स्वतंत्रपणे** I.S.B.N. **क्रमांक घेता येतो. १९८५ च्या जानेवारी महिन्यात भारतात ही प्रणाली सुरू करण्यात आली. याशिवाय** I.S.B.N. **, लेखक, प्रकाशक करार, प्रकाशन संस्थांची तांत्रिक माहिती इत्यादी बाबी पुस्तक प्रकाशन व्यवसायाचा मुख्य भाग आहेत. अर्थात मराठी प्रकाशन विश्वाची थोरली बहीण ही नेहमीच इंग्रजी होती. प्रथम इंग्रजीन स्थिर व्हाव आणि मराठीन तिच्या पावलावर पाऊल टाकत पुढे यावं असं घडत गेलेलं आपल्याला इतिहासाच्या बहुतेक पानांमध्ये दिसून येतं**

**मराठीमध्ये अधिकृत पुस्तक प्रकाशन संस्थांची संख्या उपलब्ध नोंदीनुसार एकूण ३६१ इतकी असून यात अद्यापही वाढच होताना दिसते. महाराष्ट्र राज्य शासन व यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार, साहित्य अकादमी पुरस्कार व दरवर्षी सार्वजनिक साहित्य संस्थांचे पुरस्कार यामुळे कसदार ग्रंथ निर्मितीत सातत्याने वाढ होत आहे.**

**वाचन म्हणजे एक असा छंद जो एकाग्रता आणि ज्ञान दोन्ही गोष्टीसाठी फायद्याचा ठरतो. पूर्वी ग्रंथालयात जाऊन पुस्तकं वाचन झाले की परत द्यायचे मात्र आता ग्रंथालयाची फारशी गरज राहिली नाही. याला कारण तंत्रज्ञानाची प्रगती. आता एका क्लिकवर पुस्तक मागवता येतात किंवा ई-बुक डाऊनलोड करून ताबडतोब आपल्या मोबाईलवर वाचन सुरू करता येते**

**ई-बुक म्हणजे एखाद्या पुस्तकाची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत होय. मोबाईल, कॉम्प्युटर, टॅबलेट अशा विविध इलेक्ट्रॉनिक स्क्रीनवर पुस्तक वाचण्यासाठी ई-पुस्तक ही संकल्पना अस्तित्वात आली. छापलेल्या पुस्तकाची आवृत्ती जशास तशी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात उपलब्ध करून दिली जाते. ज्याप्रमाणे महत्त्वाची**

कागदपत्रे स्कॅन करून जतन केली जातात त्याचप्रकारे छापील पुस्तके ही पुस्तक (पीडीएफ) स्वरूपात असते. पुस्तक वाचण्यासाठी कुठेही जाण्याची गरज नाही. अमेझॉन किंडल सारख्या सेवेमुळे इंटरनेटवर अनेक मराठी ई पुस्तक उपलब्ध आहेत.

### वाचन संस्कृतीची अंगे-

केवळ पुस्तके मोठ्या प्रमाणावर प्रकाशित होत असतील, त्यांचा खप होत असेल, पुस्तकांची विक्री वाढली आहे म्हणजे वाचनसंस्कृती वाढली आहे असे म्हणता येत नाही. वर्षानुवर्षे धार्मिक-आध्यात्मिक विषयावरील पुस्तके फारशा जाहिरात न करता खपताहेत. गेल्या काही वर्षात आरोग्य, गुंतवणूक, शेअर बाजार, नोकरी मार्गदर्शन या पुस्तकांना चांगली मागणी आहे. तथापि किती वाचले त्यापेक्षा काय वाचले आहे हा वाचनाचा महत्त्वाचा निकष आहे.

समाजात वाचन संस्कृती निर्माण होण्यासाठी पूरक घडामोडी समाजात घडाव्या लागतात. सार्वजनिक ग्रंथालये, वाङमयीन संस्था, साहित्य संमेलने, पुस्तक प्रदर्शने, लेखक-वाचक मेळावे, वाङमयीन नियतकालिके, दैनिकांच्या रविवार पुरवणीतील लेखन, अभिवाचन, वाचिक अभिनयाचे कार्यक्रम, वाचन मंडळे, भाषांतरे, बुक ऑन बुक्स या सर्वांमधून वाचक आणि पुस्तकांमध्ये एक अदृश्य अनुबंध तयार होतो. साहित्य संस्कृतीच्या दृष्टीने विचार केला तर जो समाज आपल्या भौतिक , सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक उन्नयनासाठी ज्ञानाचा मार्ग अनुसरतो, त्याचे भवितव्य उज्ज्वल राहते. माजी राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करत आपण वाचन संस्कृतीची जनजागृती करत आहोत. ऑनलाईन साईट्समुळे विविध विषयांवरची पुस्तके मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. समाजामध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, वाचनाचे महत्त्व कळावे यासाठी मराठी साहित्य क्षेत्रात विविध उपक्रमांद्वारे जनजागृती केली जात आहे. मराठीचा विचार केला तर सार्वजनिक ग्रंथालये, महाराष्ट्रातील काही मराठी साहित्य संस्था उदा. को.म.सा.प., द.म.सा., म.सा.प., कविता सागर, साहित्य अकादमी, विदर्भ साहित्य संघ, मालवणी बोली, झाडीबोली, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, बोली साहित्य संमेलने, विद्रोही साहित्य संमेलने, मुंबई मराठी साहित्य संघ, यासारख्या महाराष्ट्रातील मराठी साहित्य संस्था कार्यरत आहेत. तसेच बृहन्महाराष्ट्रातील मराठी साहित्य संस्था या तेलंगण, कर्नाटक, गोमंतक, छत्तीसगड, गुजरात, पश्चिम बंगाल, मध्यप्रदेश या सर्व साहित्य संस्थांच्या उपक्रमांमुळे मराठी साहित्य मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्यास मदत झाली आहे.

### संस्था-उपक्रम-योजना-

#### भिलार पुस्तकाचे अनोखे गाव

"महाबळेश्वर जवळील भिलार हे निसर्ग आणि स्ट्रॉबेरीचा गोडवा जपणारे गाव झाले आहे. 'पुस्तकांचे गाव!' भारतातील पहिल्या आणि आगळ्यावेगळ्या या पुस्तकांच्या गावामध्ये घरे, सार्वजनिक जागा मिळून २५ ठिकाणी पुस्तकांचे बहारदार विश्व फुललेले आहे."[3] विविध साहित्य प्रकारातील पंधरा हजार पुस्तके ठेवताना साहित्य प्रकारांना अनुरूप चित्रे रेखाटली आहेत. काव्यवाचन व अभिवाचनासाठी स्वतंत्र गट तयार केला आहे. भारतातील साहित्य क्षेत्रात हा नाविन्यपूर्ण उपक्रम आहे.

### राज्य मराठी विकास संस्था-

मराठी भाषा आणि महाराष्ट्राची संस्कृती यांचे संरक्षण संगोपन व संवर्धन यासाठी १ मे १९९२ रोजी 'राज्य विकास मराठी संस्थे'ची स्थापना केली. संस्थेने विविध महत्त्वाची पुस्तके प्रकाशित केली असून ई-बुक, ऑडिओ सीडी, अनुवाद, मराठीसाठी युनिकोड, भाषांतरे इत्यादी विविध उपक्रम हाती घेतले आहेत.

### नॅशनल बुक ट्रस्ट

"मनुष्यबळ विकास मंत्रालय यातील शिक्षण विभागाच्या अखत्यारीतील ही केंद्र शासनाची स्वायत्त संस्था आहे. १९५७ मध्ये स्थापन झालेल्या नॅशनल बुक ट्रस्टचे कार्यक्षेत्र पुस्तक प्रकाशन पुस्तकाचा प्रचार-प्रसार व वाचन वृत्तीचा विकास, भारतीय पुस्तकांचा परदेशी प्रचार, लेखक, प्रकाशकांना सहाय्य बालसाहित्याला प्रोत्साहन या पाच प्रमुख उपक्रमात विस्तारलेले आहे."[४] भारतीय ११ प्रमुख भाषांमध्ये साहित्य प्रकाशित करून देशभर पुस्तक मेळे व प्रदर्शन याद्वारे वाचनाच्या विकासात संस्थेचा मोठा सहभाग आहे. दिल्लीत दोन वर्षांनी जागतिक पुस्तक जत्रेचे आयोजन व पुस्तक उद्योगाच्या प्रगतीचे उपक्रम ही संस्था घेते. राष्ट्रीय बाल साहित्य केंद्राची स्थापना केली असून उत्तमोत्तम भारतीय भाषातील साहित्यकृतींचे अनुवाद केले जातात.

### अक्षरधारा - ग्रंथाचे जनु प्रयाग तीर्थ

ब्रह्माक्षराच्या वृत्तीपासून ज्ञान सागराच्या मिलनापर्यंत वेगवेगळ्या प्रवाहांना सामावून घेत कागदावरचे प्रदेश समृद्ध करत व आपला मार्ग शोधत झरझर वाहणारा ज्ञान प्रवाह म्हणजे अक्षरधारा. गेली पंचवीस वर्षे अक्षरधारा महाराष्ट्र, गोवा आणि कर्नाटक या राज्यांत अखंडितपणे पुस्तक प्रदर्शने आयोजित करीत आहे. वाचन संस्कृतीचे संवर्धन आणि साहित्य प्रसार करत असताना पुणे येथे अक्षरधारा बुक गॅलरी हे कायमस्वरूपी प्रशस्त वातानुकूलित कायमस्वरूपी ग्रंथ दालन उभारले.

### ई-साहित्य कॉम

नामवंत कवी आणि लेखक यांनी एकत्र येऊन स्थापन केले ई-साहित्य प्रतिष्ठान गेल्या दहा वर्षांत इथे उभे राहिले. आधी मुख्यत्वे कवितासंग्रह, पण आता सर्व प्रकारचे मराठी साहित्य येथे उपलब्ध आहे. स्मार्टफोनच्या वाढत्या वापराबरोबर मोबाईलवर वाचता येतील अशा ई-बुक्सची मागणी हे प्रतिष्ठान पूर्ण करते.

ई-साहित्य हा साहित्याचा वेगळा प्रकार नाही. ते साहित्याचे माध्यम आहे; पण ई-साहित्य हे पुढील पाच गुणांनी आजवरच्या साहित्याहून वेगळे ठरते.

१) निर्मिती आणि प्रसाराचा अकल्पनीय वेग, साहित्य तयार असेल, तर पुस्तक एका दिवसात बनते व एका दिवसात किमान दोन लाख लोकांपर्यंत जाते. २) निर्मिती आणि वितरणाचा नाममात्र खर्च एका वाचकामागे एक पैसा खर्च. ३) वाचकांच्या प्रतिक्रियांचा प्रचंड वेग आणि सूचना, फीडबॅक, स्तुती आणि शाबासकी. ४) निर्मितीला चित्र किंवा ध्वनींच्या आधाराने सजविणे, फोटो व ऑडिओ यांचा मुक्त वापर करता येतो. ५) टिकाऊ पण एकदा ई-साहित्य बनले की ते नष्ट होण्याची शक्यता नाही.

मराठीमध्ये पुस्तक सागर डॉट कॉम, थींक महाराष्ट्र डॉट कॉम, अक्षरनामा डॉट कॉम, बिग डॉट कॉम, मराठी प्रतीलीपी डॉट कॉम, बिगुल डॉट कॉम, बुक हंगामा डॉट कॉम, बुक शेल्फ, यूट्यूब चॅनेल, सेल्फी पोएट्री,

**वेब, टीव्ही चॅनेल, ब्रोनॅटो डॉट कॉम, बाकी काय मग, मराठी रीडर डॉट इन इत्यादी ई-साहित्य प्रसाराचे विविध महत्त्वाचे उपक्रम असून ई-पुस्तकाच्या वारंवार आवृत्त्या काढाव्या लागत नाहीत. जगभरातील वेगवेगळ्या वयोगटातील वेगवेगळ्या विचारांचे आणि वेगवेगळ्या स्तरातील वाचक ई-साहित्याशी जोडले जात आहेत.**

**९४ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नाशिक येथे संपन्न झाले. यामध्ये एक महत्त्वाचा परिसंवाद होता. "ऑनलाईन वाचन तारक की मारक. वास्तविक ऑनलाइन वाचन काळाची गरज आहे. डिजिटल माध्यमातून प्रकाशित होणारे सर्वच उच्छृखल आणि कमी दर्जाचे आहे असे समजण्याचे कारण नाही."[५] मात्र ऑनलाईन वाचनात लक्ष केंद्रीकरण, आकलन व स्मरण होत नाही. सलग वाचन होत नाही. मेंदू तल्लख होण्यासाठी वाचन आवश्यक असले तरी परिसंवादात ऑनलाईन वाचन वाचकाला तारक व प्रकाशकाला मारक ठरते हे मत मांडण्यात आले.**

## समारोपः-

**साहित्य छापील पुस्तकरूपाने आपल्याकडे अवतरले ते दोनशे वर्षापूर्वी. त्याआधी श्रवण परंपरेतून, कथा-कीर्तनातून, हस्त लिखितांच्या प्रतींमधुन प्रस्तुत होत होते. परंतु साहित्याला जनमाध्यमाचे स्वरुप आले आहे ते छपाई सुरू झाल्यानंतर. छपाईचे श्रेय गटेनबर्ग याच्याकडे जाते. लेखन-मुद्रण-वाचन ही माणसाला लाभलेली अपूर्व देणगी आहे. त्यामुळे ज्ञानवंतांची मिरास संपुष्टात आली आणि सर्वसामान्य माणूस सक्षम बनला. साहित्य क्षेत्रातील छपाई ते ई-बुक हा प्रवास पाहताना साहित्यनिर्मिती ही कुणा एकाची मक्तेदारी राहिली नसून साहित्याच्या मुख्य धारेपासून मुद्दाम वेगळ्या ठेवल्या गेलेल्या सर्व वंचित समाज घटकाचा ई-आत्मस्वर साहित्यामुळे सर्वदूर पोहोचतो आहे. कोरोना काळातील लॉकडाऊनमध्ये 'वर्क फ्रॉम होम' व 'ऑनलाईन शिक्षण' यामुळे आबालवृद्धांपर्यंत सर्वजण ई विश्वाशी जोडले गेल्याने मध्यवर्ती काम करणारी बरीच माध्यमे दूर होत लेखक-वाचक हा थेट संबंध आलेला आहे. हे मान्य करावे लागेल.**

## संदर्भः-


**१) लोकराज्य पृ. - १८**
**२) लोकराज्य पृ. - २४**
**३) प्रकाशनविश्व पृ. - २२**
**४) तत्रैव पृ. - २४**
**५) दै. तरूण भारत**